# मॅन्युअल - 3

## कलम 4 (1) (ब) (iii)

## निर्णय करण्याच्या प्रक्रियेमध्ये अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती

प्रमुख लेखापाल (वित्त) आणि प्रमुख लेखापाल (कोषागार) हे मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 च्या कलम 78(क) आणि 78 (ई) अन्वये नेमण्यात आलेले दोन वैधानिक अधिकारी आहेत.

प्रमुख लेखापाल (वित्त) हे महानगरपालिकेच्या वित्तीय बाबीसंबंधी महानगरपालिका आयुक्तांना सल्ला देणारे महानगरपालिकेचे प्रमुख वित्तीय अधिकारी असून ते महानगरपालिका, स्थायी समिती किंवा महानगरपालिका आयुक्त यांना आवश्यकता असलेल्या महानगरपालिकेच्या वित्तीय बाबींशी संबंधीत कर्तव्ये पार पाडित असतात.

प्रमुख लेखापाल (वित्त) व प्रमुख लेखापाल (कोषागार) हे खातेप्रमुख असून लेखा खात्याचे निधीनिहाय, पार पाडण्यात येणारी कामे आणि परिमंडळनिहाय निरनिराळ्या विभागांमध्ये विभाजन करण्यात आलेले आहे. या प्रत्येक विभागाचे उप प्रमुख लेखापाल हे मुख्य आहेत. या प्रत्येक विभागाचे पार पाडण्यात येणा-या कामानुसार विविध उपविभागांमध्ये विभाजन करण्यात आले असून अशा प्रत्येक उपविभागांचे लेखा अधिकारी हे मुख्य असतात आणि त्यांच्या देखरेखीखाली तेथील कामकाज चालते.

**कार्यपध्दती :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांकडून प्राप्त होणा-या आर्थिक बाबींची अंमलबजावणी करण्यासंबंधीचे प्रस्ताव / टिप्पण्यांची महानगरपालिका अधिनियम, 1888, विविध नियम व विनियम यांच्या तरतूदी, वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारी परिपत्रके व कार्यालयीन आदेश, राज्य शासन आणि केंद्र शासनाची धोरणे इ. विचारात घेउन सखोल छाननी / पडताळणी करण्याचे काम प्रमुख लेखापाल खात्यामधील संबंधीत उपविभाग / लेखा शाखा करीत असतात.

अशा प्रस्तावांची छाननी केल्यानंतर त्याबाबतीत अंतिम आदेश प्राप्त करण्यासाठी सदरचे प्रस्ताव सक्षम प्राधिका-यांना म्हणजेच उप आयुक्त / अतिरिक्त आयुक्त / महानगरपालिका आयुक्त/ किंवा स्थायी समिती / शिक्षण समिती / सुधार समिती/ एलआरजीपी समिती आणि महानगरपालिका, यांना यथास्थिती सादर केले जातात.

**खात्यातील पदे व त्यांचा स्तर दर्शविणारा आलेख :-**

प्रमुख लेखापाल (वित्त) / प्रमुख लेखापाल (कोषागार)

⇩

उप प्रमुख लेखापाल

⇩

लेखा अधिकारी □

⇩

व.ले.प.व ले.स. / मुख्य लिपिक

⇩

क.ले.प.व ले.स. / लिपिक आणि संलग्न प्रवर्ग

⇩

चतुर्थश्रेणी कर्मचारी.

(टीप :- परिपत्रक क्र.साप्रवि/उपप्रले(आस्था-2)/आरजीसेल/3 दि.16.05.2012 नुसार लेखा अधिकारी (श्रेणी-1) व लेखा अधिकारी (श्रेणी-2) या पदांचे एकत्रीकरण करून त्यांचे लेखा अधिकारी असे नामकरण करण्यात आले आहे.)

# प्रमुख लेखापाल (वित्त) /प्रमुख लेखापाल (कोषागार) खात्याची रचना दर्शविणारा तक्ता

## प्रमुख लेखापाल (वित्त)

## प्रमुख लेखापाल (कोषागार)

| उप प्रले (व्यय) | उप प्रले (आरोग्य) | उप प्रले (शिक्षणनिधी) | उप प्रले (महसूल) | उप प्रले (घकव्य) | उप प्रले (साप्र) | उप प्रले (अर्थसंकल्प) | उपप्रले (परि1) | उपप्रले (परि2) | उपप्रले (परि3) | उपप्रले (परि4) | उपप्रले (परि5) | उपप्रले (परि6) | उपप्रले (परि7) | * | उप प्रले (भ.नि.नि. व नि.वे.) | उप प्रले (गृहकर्ज) | उप प्रले (कोषागार) | उप प्रले (जकात) | उप प्रले (महसूल-3) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रकल्प शहर<br>प्रकल्प प.उप<br>प्रकल्प पू.उप | नायर रुग्णालय<br>केईएम रुग्णालय<br>जीटीबी रुग्णालय<br>कूपर रुग्णालय<br>लोटीमस रुग्णालय<br>राजावाडी रुग्णालय<br>भालोप्र-5 | ससावि/ अर्थसंकल्प<br>वेतनपत्रक<br>देयक प्रस्ताव<br>रजा पडताळणी<br>अनुदान सहा.1<br>अनुदान सहा.2 | महसूल<br>एफजीए<br>बँकीग<br>एफ आर टी<br>एफबीपी-1<br>एफबीपी-2 | ससावि (प.उप)<br>घकव्य-1<br>घकव्य-2<br>वेतनपत्रक (प.उप)<br>परिवहन | स.सा.वि.-शहर<br>अभिलेख-शहर | अर्थसंकल्प<br>एफएआर | ए<br>बी<br>सी<br>डी<br>ई<br>ई-1<br>यां.व वि. | एफ/द<br>एफ/उ<br>जी/द<br>जी/उ | एच/पू<br>एच/प<br>के/पू | के/प<br>पी/द<br>पी/उ | स.सा.वि.<br>रोख<br>एल<br>एम/पू<br>एम/प<br>देवनार | एन<br>एस<br>टी | आर/द<br>आर/मध्य<br>आर/उ | ले.अ. (वैयक्तिक) | निवृत्तीवेतन - दक्षता<br>निवृत्तीवेतन 1<br>निवृत्तीवेतन 2<br>निवृत्तीवेतन आयबी<br>भ.नि.नि.कक्ष<br>भ.नि.नि.1<br>भ.नि.नि.2<br>भ.नि.नि.अग्रीम 1<br>भ.नि.नि.अग्रीम 2<br>भ.नि.नि.-संकीर्ण /एफ डी सी पी एस<br>वेतनपत्रक – 1<br>वेतनपत्रक – 2 / आयकर<br>रजा पडताळणी | गृहकर्ज -1<br>गृहकर्ज -2 | रोख (शहर)/ वेतनप्रदाता<br>ताळेबंद / ठेव<br>डी1<br>संगणक | जकात 1<br>जकात 2<br>जकात 3 | महसूल3 (शहर) महसूल3 (पउप) महसूल3 (पूउप) |

उप महापालिका आयुक्त (सुधार) यांच्या अखत्यारित कार्यरत

- चाचणी लेखा परिक्षा व दक्षता अधिकारी
  - दक्षता-1
  - दक्षता – 2
  - दक्षता- 3
  - संग्रह पडताळणी - 1
  - संग्रह पडताळणी – 2
  - लेखा टिप्पणी पाठपुरावा कक्ष

उप महापालिका आयुक्त (साप्र) यांच्या अखत्यारित कार्यरत

- उप प्रमुख लेखापाल (आस्था-1)
  - रचना व कार्यपध्दती 1
  - रचना व कार्यपध्दती 2
  - रचना व कार्यपध्दती 3
  - एफईसी/ओवन
  - एफईएच
- उप प्रमुख लेखापाल (आस्था-2)
  - एफजीआर
  - आरजीसेल
  - एफईई/एफईएम

प्रमुख लेखापाल (मध्यवर्ती खरेदी खाते) यांच्या अखत्यारित कार्यरत

- मखखा - I
- मखखा – II
- मखखा - III

* लेखा अधिकारी (स्वीय) हे प्रमुख लेखापाल (वित्त) यांच्या थेट नियंत्रणाखाली काम करतात